# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.01.2026** **वार- बुधवार**

---

उप-मुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनामुळं महाराष्ट्रात 30 तारखेपर्यंत तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या पार्थिव देहावर उद्या सकाळी अकराच्या सुमारास बारामती इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, असं सामान्य प्रशासन (राजशिष्टाचार) विभागामार्फत कळविण्यात आलं आहे. या तीन दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्रातील ज्या इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येईल. तसंच या कालावधीत कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार नाहीत. पुण्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांमधील बाजारपेठा आज बंद ठेवण्यात आल्या होत्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं बारामती इथं आज सकाळी विमान अपघातात निधन झाल्याबद्दल सर्व राजकीय वर्तुळातून तीव्र शोक व्यक्त करण्यात आला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, बारामती इथल्या विमान दुर्घटनेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं निधन झाल्याचं वृत्त अत्यंत क्लेशदायक आहे. त्यांचं अकाली जाणं हे राज्याच्या विकासासाठी नुकसानकारक आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीत, विशेषतः सहकारी क्षेत्रात त्यांनी दिलेलं योगदान ऐतिहासिक आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात अजित पवार यांच्या संदर्भातील आठवणींना उजाळा दिला. पंतप्रधान म्हणाले की अजित पवार हे जमिनीशी जोडलेले नेतृत्व होते. महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर असणारं कष्टाळू व्यक्तिमत्व म्हणून त्यांना ओळखलं जायचं. त्यांची प्रशासकीय कामांची जाण आणि गरिबांच्या कल्याणाची तळमळ उल्लेखनीय होती. त्यांचं निधन धक्कादायक आहे.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अजित पवार यांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव मांडला. अजित पवार दहाव्या लोकसभेचे सन्माननीय सदस्य होते. सहा वेळा उपमुख्यमंत्री आणि आठ वेळा विधानसभेचे सदस्य म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर आपली पकड निर्माण केली होती. सार्वजनिक जीवनातील त्यांची बांधिलकी सदैव स्मरणीय राहील असं बिर्ला म्हणाले. यानंतर संपूर्ण सभागृहानं दिवंगत नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी अजित पवार यांचे कुटुंबिय, सहकारी आणि असंख्य समर्थकांना हा दुःखद प्रसंग सहन करण्याचं धैर्य प्रदान करो, अशी प्रार्थना आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की अजितदादा पवार लोकनेते होते, त्यांच्याबद्दल लोकांमध्ये प्रचंड आस्था होती, अतिशय संघर्षशील नेते होते, कोणत्याही परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारे ते नेते

होते. राज्यासाठी हा अतिशय कठीण दिवस आहे, अजित पवार यांच्यासारखं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्ष जातात, अशा शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली आहे.

अजितदादा मनानं निर्मळ होते. अजितदादांचा स्पष्टवक्तेपणा संपूर्ण महाराष्ट्रानं पाहिलेला आहे. त्यांच्यासारख्या शिस्तप्रिय नेत्याच्या जाण्यानं महाराष्ट्राचं कधीही न भरून येणारं नुकसान झालं असल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

आमच्या महायुतीतील ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या जाण्यानं मी अत्यंत व्यथित झालो आहे. ही घटना अतिशय दुर्दैवी असल्याची भावना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली आहे. अजित पवार यांच्या निधनानं महायुतीची कधीही भरून न निघणारी हानी झाली असल्याची भावना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली आहे.

गेली अनेक वर्षं राज्याच्या विधिमंडळात सोबत काम करताना अजितदादांशी अतिशय जवळचा संबंध राहिला आहे. त्यांचं  प्रशासनिक कौशल्य, विकासात्मक दृष्टिकोन आणि लोकांना जोडण्याची हातोटी यांमुळं अजितदादांचं कायमच महाराष्ट्राच्या राजकारणात एक अढळ स्थान राहिलं आहे. महाराष्ट्राच्या विकासाची आकांक्षा असलेल्या या लोकनेत्याचं अकाली निधन होणं, ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची कधीही भरून न निघणारी हानी आहे. या दुःखद प्रसंगी संपूर्ण पवार कुटुंबियांसोबत माझ्या संवेदना आहेत अशा भावना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केल्या आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाची घटना अत्यंत दुःखद आहे. याप्रसंगी मी त्यांच्या सर्व कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त करतो असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले, संजय राऊत, काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मंत्री उदय सामंत, पीयूष गोयल यांनी समाज मध्यमांवरील आपल्या संदेशांमधून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविषयी आपल्या भावना व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**